Marketing and Publicity
Head Office
media@mahabank.co.in; cmmedia@mahabank.co.in

**प्रसिद्धीसाठी**

# बँक ऑफ महाराष्ट्र अधिकारी-कर्मचाऱ्यांतर्फे मुख्यमंत्री सहायता निधीस रु. 2 कोटी 35 लाखांची मदत



**फोटोमध्ये:** रुपये 2,35,00,000/- (रु. दोन कोटी पस्तीस लाख केवळ) चा धनादेश मुख्यमंत्री श्री उद्धव ठाकरे यांच्याकडे सुपूर्द करताना बँक ऑफ महाराष्ट्रचे सरव्यवस्थापक आणि मुंबई अंचल प्रमुख श्री विजय कांबळे,.

**पुणे, डिसेंबर 13, 2019**: बँक ऑफ महाराष्ट्रच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सामाजिक उत्तरदायीत्वाच्या भावनेतून आपल्या एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीस दिले आहे. मंत्रालयात झालेल्या या कार्यक्रमात रुपये **2,35,00,000/-** (रु. दोन कोटी पस्तीस लाख केवळ) चा धनादेश बँक ऑफ महाराष्ट्रचे सरव्यवस्थापक आणि मुंबई अंचल प्रमुख श्री विजय कांबळे यांनी मुख्यमंत्री श्री उद्धव ठाकरे यांच्याकडे सुपूर्द केला. ही मदत महाराष्ट्र राज्यातील पूरग्रस्त भागातील बाधित नागरिकांच्या पुनर्वसनासाठी दिलेली आहे.